**MHAK100010142023**

## Cri.M.A./255/2023

## Arti Nitesh Rathod Vs. Nitesh Mahadeo Rathod

निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश

अर्जदार हिने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ (येथून पूढे सोयीसाठी घरगुती हिसांचार कायदा असा उल्लेख करण्यात आला आहे) या कायद्य ान्वये कलम १२ अन्वये मुळ अर्ज दाखल केला असून विविध मागण्यांची मागणी केली असून प्रस्तुत अर्जान्वये कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांनी सदर अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये १५,०००/—ची मागणी केली आहे.

अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे :

०२. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार तिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ यांच्या सोबत दिनांक ०७.०५.२०१८ रोजी बोडखा येथे झाला. लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदार हिच्या वडीलांनी केला असून लग्नामध्ये १,५०,०००/—रूपये रोख व सोन्याचे दागीणे आणि संसार उपयोगी वस्तु दिल्या होत्या. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार ती एकत्र कूटूंबात नांदायला गेली. त्या ठिकाणी तिला सुरूवातीचे ८ महीने चांगली वागणुक दिली. त्या नंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला मुलं होत नसल्याचे कारणावरून शिवीगाळ करणे व त्रास देण्यास सुरूवात केली.

०३. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदार हिला वांज म्हणायची तसेच सर्वांना मुलं होतात तुलाच का होत नाही असे म्हणून वाद घालून मारहाण करायची. गैरअर्जदार क्रमांक ३, ४, ५ आणि ६ हे सुध्दा या ना त्या कारणावरून वाद घालून घटस्फोट

घेण्यासाठी धमकावत असत. गैरअर्जदार क्र. १ याला इतर गैरअर्जदार भडकावून देत असत व त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा दारू पिवून प्लॉस्टीकच्या पाईपने, काठीने खुर्चीने अर्जदार हिला मारहाण करत असे. गैरअर्जदार हे अर्जदार हिला घरगुती खर्चासाठी माहेरावरून पैसे आणण्यास सांगत असत, त्या साठी शारिरीक व मानसिक त्रास देत असत. अर्जदार हिने त्रासाला कंटाळून टप्प्याटप्याने गैरअर्जदार यांना माहेरावरून ५० हजार रूपये आणून दिले होते. तरीदेखील गैरअर्जदार यांनी ट्क घेण्यासाठी पून्हा १,५०,०००/— रूपयाची मागणी केली व त्याकरीता शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरूवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिच्यावर संशय घेवून चापटा बुक्क्यानी मारहाण करत असे.

०४. सप्टेबर २०१९ मध्ये गैअर्जदार क्र. १ व २ यांनी अर्जदार हिच्या चारीत्र्यावर सशंय घेवून तिच्या सोबत वाद घातला व तिला चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच तिच्या अंगावर घासलेट टाकून पेटविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी शेजा—यांनी मध्यस्थी करून अर्जदार हिचे प्राण वाचविले. गैरअर्जदार हे अर्जदार हिला मुलं होत नसल्याच्या कारणावरून चापटा बुक्क्यांनी मारहाण करत. दिनांक २७.०३. २०२३ रोजी सकाळी ८.०० वाजताच्या दरम्यान गैरअर्जदार हा दारू पिवून आला व अर्जदार हिला विनाकारण शिवीगाळ करू लागला तसेच तिला चापटा बुक्क्यानी मारहाण केली. इतर गैरअर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ याला मारहाण करण्यासाठी प्रोत्साहीत करत होते. संध्याकाळी पून्हा गैरअर्जदार क्र. १ दारू पिवून आला व पून्हा अर्जदार हिला चापटा बुक्क्यानी मारहाण केली. दिनांक २८.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदार हिच्या भावाने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदार यांनी त्याला सुध्दा घरातून हाकालून दिले व तेव्हा पासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे.

०५. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नसून ती स्वतःचा उदरभरणा करू शकत नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ याचेकडे २ एकर शेती असून त्या पासून तो ४ लाख रूपये उत्पन्न मिळवितो. गैरअर्जदार क्र. ३ यांच्या नावे

असलेला ट्क देखील गैरअर्जदार क्र.१ हाच चालवितो व त्या पासून त्यांना ५०,०००/— रूपये उत्पन्न मिळते. अर्जदार हिच्या सासरी किराण दुकाण असून त्यापासून त्यांना २०,०००/—रूपये महीना मिळतो. तसेच अर्जदार हिचा जेठ मजुरीमधून १२,०००/— रूपये उत्पन्न मिळवतो. तसेच गैरअर्जदार क्र. १ याच्यावर कुणाचीही जबाबदारी नाही अशा परिस्थीतीत अर्जदार हिला उदरनिर्वाह करीता तसेच निवासाकरीता १५,०००/—रूपये दरमहा मिळण्याची विनंती केली.

०६. प्रस्तुतच्या प्रकरणात गैरअर्जदार क्र.१ यांनी हजर होवून नि.०८ वर त्यांनी जबाब दाखल केला असून अर्जदार हिच्या सोबतचे लग्न मान्य केले. परंतु त्या व्यतिरीक्त सर्व कथन फेटाळून लावले. गैरअर्जदार क्र. १ यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार व त्यांचा विवाह आर्दश पध्दतीने झाला, विवाह सोहळयामध्ये गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला तिन लाख रूपयाचे दागीने दिले होते सदरचे दागीने आज रोजी अर्जदार ही माहेरी निघून गेली.

०७. अर्जदार ही कुठलेही कारण नसतांना गैरअर्जदार क्र.१ यांना शरीर सुखापासून वंचीत ठेवत असे व नेहमी माहेरी राहायला चला असा तगादा लावत असे. गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिच्या प्रेमा पोटी लग्न झाल्यापासून कुटूंबापासून वेगळे राहत असून अर्जदार ही कुठलेही कारण नसतांना सतत माहेरी जात असे. अर्जदार हिचा इतर गैरअर्जदार यांच्यासोबत कधीही संबंध आला नाही. दिनांक २८.०३.२०२३ रोजी अर्जदार हिने सांगीतल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नव्हती.

०८. गैरअर्जदार आजरोजी बेरोजगार असून त्याचेकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. याउलट अर्जदार ही पार्लर व कपडे शिवणकाम करत असून महीन्याला १५ हजार रूपये दरमहा कमावते. गैअर्जदार बरेचवेळा अर्जदार हिला भेटायला माहेरी गेला होता. परंतु त्या ठिकाणी गैरअर्जदार यांना अर्जदार हिच्या भावाने व वडीलांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. गैरअर्जदार क्र. १ यांनी प्रेमापोटी त्याबाबतची तक्रार नोंदविली नव्हती. गैरअर्जदार क्र. १ हा आज रोजी सुध्दा अर्जदार हिला नांदविण्यास

तयार असून अर्जदार गैरअजदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

## मुद्दे :

०९. अर्जदार यांचा अर्ज व गैरअर्जदार व त्यांचा जबाब तसेच अर्जदारार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणांसहित नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदारांचा घरगुती हिसांचार केला हे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करते का? | होय. |
| २. | अर्जदार पोटगी म्हणून तिला दरमहा १५,०००/—अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी |
| ३. | अर्जदार ही मागणीप्रमाणे निवारा व्यवस्था मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| ४. | अर्जदार हे मागणीप्रमाणे हिंसाचारापासून सरंक्षण मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| ५. | काय आदेश? | अर्जदार हिला दरमहा रुपये ४,०००/— |

## यु क्ती वा द

१०. अर्जदार यांचे तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा वैवाहीक संबंध गैरअर्जदार यांनी मान्य केला. अर्जदार यांनी त्यांच्या लग्नाची पत्रीका तसेच लग्नाचे फोटो व लग्नामध्ये मिळालेले आधंन , अहेर याबाबतचे दस्त अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार हिने तिच्यावर होत असलेला घरगुती

हिंसाचारा बाबत दिनांक १९.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन पातूर येथे दाखल केलेला अदखलपात्र गुन्हयाची प्रत अभिलेखावर दाखल केली असून त्यावर गैरअर्जदार हे अर्जदार हिच्यावर घरगुती हिंसाचार करत असल्याचे सिध्द होते. अर्जदार यांनी नि.११ वर उत्पन्न व दायीत्वाचे प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यानुसार गैरअर्जदार हा २०,०००/— ते ३५,०००/— रूपये महीना कमावतो. अशा परिस्थीतीत अर्जदार यांनी १५,०००/— रूपये दरमहा खावटी मिळण्याची विनंती केली.

११. प्रस्तुतच्या प्रकरणात गैरअर्जदार यांना वेळोवेळी संधी देउन देखील त्यांनी अथवा त्यांचे वतीने कोणीही न्यायालयासमक्ष हजर होउन युक्तीवाद केला नाही. त्यामुळे दिनांक ०४.१२.२०२५ रोजी नि. १ खाली आदेश पारित करून प्रस्तुतचा अर्ज विना युक्तीवाद निकाली काढण्यात आला.

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्या क्रमांक १ ते ३ साठी</u> :

१२. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराची विस्तृत अशी व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारीरीक, मानसीक, भावनिक तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा समावेश होतो. अर्जदाराने तिच्या अर्जात म्हटले आहे की, ती नांदायला गैरअर्जदार यांच्या घरी गेली असता सर्व गैरअर्जदार हे एकत्र राहत होते. गैरअर्जदार यांनी तिला कशाप्रकारे त्रास देउन मारहाण केली हे तिने तिच्या अर्जात तारखांसहित कथन केले आहे. शिवीगाळ करुन तसेच मारहाण करणे, पैशासाठी तगादा लावणे, या बाबी भावनिक व शारीरीक हिंसाचार या संज्ञेमध्ये मोडतात. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या पालनपोषणासाठी आर्थिक मदत न करणे ही बाब देखील आर्थिक हिसांचार यामध्ये बसते. अर्जदाराने तिच्या अर्जात स्पष्टपणे शिवीगाळ व मारहाण केल्याबाबत नमुद केले आहे.

१३. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांनी त्यांचे लग्न मान्य केलेले आहे. प्रस्तुतच्या अर्जानुसार गैरअर्जदार हा अर्जदार हिला शारिरीक व मानसिक छळ करत असल्याचे म्हटलेले आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या हातून तिच्यावर होत असलेलया शारिरीक व मानसिक छळाबाबत प्रस्तुतच्या अर्जामध्ये तारखेसह नमूद केलेले आहे. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार तिला मुलं होत नसलयाने सर्व गैरअर्जदार हिनवत असत. अर्जदार हिला गैरअर्जदार हा दारू पिवून मारहाण करत असलयाचे नमूद असून अर्जदार हिला माहेरावरून पैसे आणण्याकरीता वेळोवेळी त्रास दिल्याचे सुध्दा नमूद आहे. अर्जदार हिने सप्टेबर २०१९ मध्ये तिच्यावर घासलेट टाकून मारून टाकण्याचा प्रयत्न केल्याबाबत नमुद केले आहे. त्याच बरोबर दिनांक २७.०३.२०२३ रोजी सकाळी व संध्याकाळी झालेल्या मारहाणीबाबत सुध्दा अर्जदार हिने नमूद केलेले आहे. वरिल सर्व घटना हया प्रथमदर्शनी अर्जदार यांच्यावर शारिरीक व मानसिक छळ होत असल्याचे सिध्द करतात. अर्जदार यांनी दिनांक १९.०५.२०२३ रोजी गैरअर्जदार यांच्या विरूध्द दिलेला अदखलपात्र गुन्हयाची प्रत यावरून अर्जदार हिच्या कथनास दुजोरा मिळत आहे.

१४. अर्जदार हिने अर्जामध्ये तिला झालेल्या मानसीक छळाबाबत स्पष्टपणे सांगीतले असुन सद्य:स्थितीला या अर्जामध्ये पुराव्यामध्ये खोलात न उतरता प्रथमदर्शनी अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांवर अवलंबुन राहुन सदरचा अर्ज निकाली काढावा लागतो. ज्याअर्थी अर्जदार ही माहेरी राहत आहे, त्याअर्थी नक्कीच कुठलीही विवाहीत स्त्री कारण नसतांना तिच्या पतीचे घर सोडून माहेरी राहायला जाणे न पटण्याजोगे आहे. प्रथमदर्शनी गैरअर्जदार हयांच्या विरूध्द अर्जदार हिने केलेले आरोप ठळकपणे दिसुन येतात. त्याचबरोबर अर्जदार हिची राहण्याची खाण्याची काय व्यवस्था गैरअर्जदार याने केली याबाबत अभिलेखावर काहीही आलेले नाही.

१५. एकंदरीत अर्जदार यांचे अर्जावरुन व दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार यांचा गैरअर्जदार यांच्याकडुन शारिरीक व मानसीक छळ झालेला आहे. त्यानंतर अर्जदार हिला गैरअर्जदार यांनी नांदवण्यासाठी

कुठले प्रयत्न केले हे दाखविणारे दस्त अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे, तसेच अर्जदार ज्या दिवशी माहेरी आली त्या दिवसापासून आजपर्यंत गैरअर्जदार यांनी तिची राहण्याची तसेच खाण्यापिण्याची कुठलीही सोय केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदार हिची पालनपोषणाची जबाबदारी ही गैरअर्जदार यांची असुन त्यांच्या जबाबावरुन त्यांनी अर्जदाराच्या पालनपोषणासाठी कुठले पाउल उचलले याबाबत कुठलीही स्पष्टता दिसुन येत नाही. अशा परिस्थीती गैरअर्जदार हा जाणुनबुजून अर्जदाराची जबाबदारी टाळत आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे वरील विवेचनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारीरीक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ करुन घरगुती हिंसाचार केला आहे. त्यामुळे मी मुद्या क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

<u>मुद्या क्रमांक २ ते ४ साठी</u> :

१६. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा घरगुती छळ केला आहे हे सकृतदर्शनी निष्कर्ष नोंदवल्यानंतर अर्जदार हिला आर्थिक मदत म्हणून रक्कम रुपये १५,०००/— मिळण्यास पात्र आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. अर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्र तसेच नि. ११ वर दाखल असलेले संपत्ती व दायीत्वाचे विवरण याचे अवलोकन केले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे दोन एकर शेती असून त्यापासून त्याला ४,००,०००/— रूपये उत्पन्न मिळते. तसेच त्याला ट्क्टर पासून ५०,०००/—रूपये प्रतिमहा उत्पन्न असून अर्जदार हा मजूरीतून महीण्याकाठी २०,०००/— ते ३५,०००/— रूपये कमावतो. असे असले तरी प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदार यांनी शेताबाबत, ट्क्टरबाबत कुठलेही दस्त अभिलेखावर आणले नाही. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदार हिने हे मान्य केले आहे की, गैरअर्जदार यांचेकडे असलेला ट्क्टर हा त्यांचे वडीलांचा आहे. त्यामुळे त्यावर अवलंबून राहून गैरअर्जदार यांचे उत्पन्न ठरविणे योग्य होणार नाही म्हणून मी गैरअर्जदार याचे उत्पन्न कुशल कारागीर यांना मिळत असलेल्या रोजानुसार अंदाजे ठरवत आहे.

१७. प्रस्तुतच्या प्रकरणात जरी गैरअर्जदार यांनी हे नमूद केले आहे की ते आजरोजी कुठलेही काम करत नाही. असे असले तरी गैरअर्जदार हे शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असून केवळ गैरअर्जदार हे बेरोजगार आहेत असे म्हणून त्यांच्यावर असलेली अर्जदार यांची जबाबदारी टाळू शकत नाही. त्यामुळे मी गैरअर्जदार यांचे अंदाजे उत्पन्न दिवसाकाठी ४००/— ते ५००/— रूपये असलयाचे गृहीत धरून १०,०००/— ते १२,०००/— रूपये अर्जदार महीन्याकाठी कमावत असल्याचे ठरवत आहे. गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार हिचे पती या नात्याने पालनपोषणाची व्यवस्था करणे याची सर्वस्वी नैतिक व कायदेशीर जबाबदारी हि गैरअर्जदार क्र. १ यांचीच असून ती त्यांनी पार पाडली हे अभिलेखावरुन दिसून येत नाही. अशा परिस्थितीत अर्जदार हिचे समाजातील असलेले स्थान, शिक्षण, राहणीमान या सर्व गोष्टींचा विचार करुन अर्जदार हिस रक्कम ठरवणे आवश्यक आहे. एकंदरीतच अशा परिस्थीतीमध्ये पालनपोषणसाठी लागणारा खर्च व जबाबदा—या लक्षात घेता गैरअर्जदार हा अर्जदार यांना खावटी देण्यास पात्र दिसुन येतो.

१८. घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २ अन्वये न्यायालय अर्जदाराला आर्थिक मदत म्हणून अंतरिम आदेश पारित करु शकते. अर्जदार हिच्या पालनपोषणासाठी तसेच दैनंदिन लागणारा खर्च, वैद्यकीय उपचारासाठी लागणारा खर्च या बाबींचा विचार करता तसेच गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती पाहता गैरअर्जदार यांनी आर्थिक मदत म्हणून अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ३०००/— दरमहा दयावेत असा आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. ज्याअर्थी अर्जदार हिने निवा—याची व्यवस्था होउन मिळणेबाबत मागणी केली आहे. त्याअर्थी ती राहत असलेल्या गावाचा विचार करता निवारा /घरभाडे म्हणून १०००/—रूपये दरमहा रूपये देणे न्यायोचित ठरते. करिता मी मुद्या क्रमांक २ ते ४ चा निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदवत असून, मुद्या क्रमांक ५ करिता खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार याने अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २२.०८.२०२३ पासून घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २ अन्वये अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ३०००/—(रुपये तिन हजार फक्त) म्हणून दयावे असा आदेश देण्यात येतो.

३. गैरअर्जदार याने अर्जदार हयांची निवा—याची व्यवस्था म्हणून घरभाडे दरमहा १०००/— रूपये अर्ज दाखल तारखेपासुन दयावेत असा आदेश देण्यात येते.

४. गैरअर्जदार यांनी अर्जदारा सोबत कुठल्याही प्रकारचा हिंसाचार करू नये असा आदेश देण्यात येते.

५. अर्ज दाखल तारखेपासून ते अंतरिम अर्जावरील आदेश होणेपर्यंतची आर्थिक मदतीची रक्कम हि गैरअर्जदार क्रमांक १ याने आदेश पारित झाल्यापासून ०३ महिन्याच्या आतमध्ये अर्जदारास दयावी व तेथून पुढील रक्कम हि प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये अर्जदारास दयावी असा देखील आदेश देण्यात येतो.

६. अर्जदार व गैरअर्जदार यांना सदरील आदेशाची प्रत घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २४ अन्वये विनाशुल्क देण्यात यावी.

PRASAD SAHEBRAO THAKARE
Digitally signed by PRASAD SAHEBRAO THAKARE
Date: 2026.01.21 11:00:57 +0530

पातुर
दिनांकः १९.०१.२०२६.

(प्रसाद एस. ठाकरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर.